Shikshan Prasarak Mandal's
**GOPAL KRISHNA GOKHALE COLLEGE,**
**KOLHAPUR.**
'B' Ward, Subhash Road, Kolhapur Pin- 416 012.
Phone No- (0231) 2642540 /2642340
E-Mail:- gkgcollege1950@gmail.com g260.cl@unishivaji.ac.in Web Site:- www.gkgcollege.com
J.23.09.007
Vice Prin. Shri. S .H Pisal
M.Sc. B.Ed.
I/C Prin. Dr.P.K. Patil
M. A. Ph.D.(Eco.)

Ref. No.GKG/ 69 /2020-21

Date - 16/07/2020

# नोटीस

## इ. १२ वी. विद्यार्थ्याकरीता

इ. १२ वी कला,वाणिज्य,विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र फेब्रु/मार्च २०२०परीक्षेमध्ये जे विद्यार्थी अनुत्तीर्ण झालेले आहे किंवा कमी गुण मिळवून पास झालेले आहेत. ज्यांना गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मुल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी व श्रेणी/गुणसुधार सबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिक्रत सोबत जोडलेल्या प्रकटन दि.१५.०७.२०२० नुसार सर्वानी नोंद घ्यावी व सुचनांचे पालन करुन दिलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क ऑनलाइन भरुन विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहिल याची नोंद घ्यावी.

G. K. GOKHALE COLLEGE KOLHAPUR

उपप्राचार्य,
गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय,
कोल्हापूर.

सोबत - दि.१५.०७.२०२० एच.एस.सी बोर्डाचे प्रकटन

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

# प्रकटन

**विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२० च्या निकालाबाबत**

---

मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार जाहीर करण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर गुरुवार दिनांक १६/०७/२०२० रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत आहे. मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. www.mahresult.nic.in
२. www.hscresult.mkcl.org
३. www.maharashtraeducation.com

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण उपरोक्त संकेतस्थळांवरुन उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आउट) घेता येईल.

www.mahresult.nic.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालाशिवाय निकालाबाबतची इतर सांख्यिकीय माहिती उपलब्ध होईल.

तसेच www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

## सदर निकालाबाबतचा अन्य तपशील पुढीलप्रमाणे-

१) ऑनलाईन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांस स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून (http://verification.mh-hsc.ac.in) स्वतः किंवा शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय या परीक्षेपासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. यासाठी आवश्यक अटी/शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत. गुणपडताळणीसाठी शुक्रवार, दिनांक १७/०७/२०२० ते सोमवार दिनांक २७/०७/२०२० पर्यंत व छायाप्रतीसाठी शुक्रवार, दिनांक १७/०७/२०२० ते बुधवार, दिनांक ०५/०८/२०२० पर्यंत अर्ज ऑनलाईन पध्दतीने करता येईल. त्यासोबतच ऑनलाईन पध्दतीने शुल्क (Debit Card/ Credit Card/ UPI/ Net Banking) याद्वारे भरता येईल.

Notice Board
15/07/2020

२) फेब्रुवारी- मार्च २०२० परीक्षेच्या उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन विहित नमुन्यात विहित शुल्क भरुन संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

३) फेब्रुवारी-मार्च २०२० च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या दोनच संधी श्रेणी/गुणसुधार (Class Improvement Scheme) योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

दिनांक १५/०७/२०२०

(डॉ. अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४